# नियमित दिवाणी दावा क्र. ८२/२०१४ मधील

## निशाण क्र. ११२ खालील आदेश

**CNR No.- MHRT0500007712014**

प्रस्तुत अर्ज हा वादी यांनी प्रतिवादी क्र. ७ व १४ चे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र. ७ रघुनाथ गणपत कदम हे दिनांक ०२.०१.२०२१ रोजी वृधापकाळामुळे मयत झाले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १४ रविंद्र धोंडू कदम हे दि.०१.०५.२०२१ रोजी कोविड या रोगामुळे मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र. ७ व १४ यांचेबाबत वेळेतच तजवीज करून त्यांचे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर आणणे आवश्यक होते. परंतु वादी यांना कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे प्रतिवादी क्र.७ व १४ चे कायदेशीर प्रतिनिधी मुदतीत अभिलेखावर आणता आले नाही. वादी यांनी मयत प्रतिवादींचे कायदेशीर प्रतिनिधींची तजवीज न केल्यामुळे मयत प्रतिवादी क्र. ७ व १४ यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर आणणेकरीता अनुक्रमे १०२२ व ७५० दिवसांचा विलंब झाला आहे. सदरचा विलंब हा माफ न झाल्यास वादी यांच अपरिमित असे नुकसान होणार आहे. तरी सदरचा विलंब माफ करून मिळणेकरीता अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर अर्जास प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे म्हणणे देवून अर्जास विरोध दर्शविला आहे तसेच अर्ज बेकायदा व मुदतबाह्य आहे, अर्जास योग्य ते कारण दिलेले नाही त्यामुळे अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे सन्मानिय विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, प्रकरणाचा अभिलेख पाहिला.

५. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता सदरचा दावा हा दावा मिळकतीतील अतिक्रमण काढून मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला असल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र. ७ हे दि.०२.०१.२०२१ रोजी व प्रतिवादी क्र.१४ हे दि.०१.०५.२०२१ रोजी मयत झालेची बाब यातील इतर प्रतिवादी यांनी नाकारलेली नाही. वादी यांनी त्यांचे अर्जाचे पृष्ट्यर्थ शपथपत्र दाखल केलेले आहे तसेच अर्जासोबत मयत प्रतिवादी क्र. ७ व १४ यांचे मृत्यु दाखल्यांच्या प्रती दाखल केल्या आहेत. प्रतिवादी क्र.७ हे दि.०२.०१.२०२१ रोजी व प्रतिवादी क्र.१४ हे दि.०१.०५.२०२१ रोजी मयत झाले असल्याने मुदतीच्या कायद्यातील तरतुदीनुसार त्यांचे कायदेशीर प्रतिनिधींना मयत दिनांकापासून ९० दिवसांचे आत अभिलेखावर वादी यांनी घेणे आवश्यक होते. परंतु वादी यांच्या कथनांचा विचार करता व प्रतिवादी क्र. ७ व १४ यांच्या मृत्युचा कालावधी पाहता, सदरच्या कालावधीमध्ये कोरोना रोगाचा प्रादुर्भाव असल्याने न्यायालयीन कामकाज तसेच इतर कार्यालये सुरळीत चालू नव्हती.

६. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता व वादीचे दाव्यातील मागणी पाहता प्रतिवादीचे पश्चात दावा चालविणेचा अधिकार त्याचे कायदेशीर प्रतिनिधीस प्राप्त होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ७ व १४ चे कायदेशीर प्रतिनिधींना याकामी अभिलेखावर घेणेची संधी वादी यांना दिल्यास सदर वादविषयाला घेवून भविष्यात दाखल होणा–या अनेक दाव्यांची पुर्नरावृत्ती थांबेल. तसेच वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास आवश्यक ते पक्षकार प्रतिवादीपणात सामील होणार आहेत आणि दावा कायदेशीरपणे गुणदोषांवर चालवून अंतिमरित्या निकाल होण्यासाठी ते आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. ७ व १४ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याकरीता विलंब झाला आहे. सदरचा विलंब हा नजरेआड करता येणार नाही. वादी यांनी मुदतीत प्रतिवादींचे कायदेशीर प्रतिनिधींना याकामी अभिलेखावर न घेतल्याने सदरचे प्रकरण काही काळ प्रलंबित राहिले आहे. परंतु विलंब झाला या कारणास्तव वादींचा अर्ज नामंजूर करणे

न्यायोचित ठरणारे नाही. याचा मध्य साधता सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १ व २ यांना कॉस्ट रक्कम देण्याच्या अटीवर मंजूर करणे न्यायोचित ठरेल असे मला वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अर्ज (नि.११२) हा वादी यांनी रक्कम रु.२,०००/– प्रतिवादी क्र. १ व २ यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. मयत प्रतिवादी क्र. ७ व १४ यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांना अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

**दिनांक– २२/०२/२०२४**

**सही/–**
**(मनिषा म. पाटील)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी**

## CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No. 82/2014 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Shri. V. V. Bamane |
| Court Name | : | 2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Court, Khed. |
| Date of Decision | : | 22.02.2024 |
| Order signed by Presiding Officer on | : | 22.02.2024 |
| Judgment/Order uploaded on | : | 23.02.2024 |